# • निवेदन •

मी या निवेदनाद्वारे जाहीर करतो की , "कोल्हापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा इतिहास " THE HISTORY OF R. S. S. IN KOLHAPUR DISTRICT हा प्रबंध माझे संशोधन मार्गदर्शक डॉ. बी. आर. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वत: लिहीला असून सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विषयातील एम्.फिल. पदवीसाठी विद्यापीठास सादर केला आहे.

कोल्हापूर :
दिनांक :

सुनिल चंद्रकांत वांकर
अभ्यासक

# • प्रमाणपत्र •

श्री. सुनिल चंद्रकांत वांकर यांनी इतिहास विषयातील एम्. फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांजकडे सादर करावयाचा " कोल्हापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा इतिहास " THE HISTORY OF R. S. S. IN KOLHAPUR DISTRICT हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. श्री. वांकर यांनी लिहीलेला प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारित आहे.

डॉ. बी. आर. कांबळे
इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर
मार्गदर्शक

# • अनुक्रमणिका •


| अनु.क्र | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| १. | **डॉ. हेडगेवार बालपण व शिक्षण** | १ ते २४ |
| | १) हेडगेवार घराण्याचा पूर्वइतिहास | |
| | २) जन्म व बालपण | |
| | ३) केशवचे शिक्षण | |
| | ४) बालपणातील राष्ट्र स्वाभिमान | |
| | ५) सातव्या एडवर्डचा राज्यरोहण | |
| | ६) वझे गुरूजींच्या घरातील भुयार | |
| | ७) क्रांतिकारी गट | |
| | ८) कॉंग्रेस | |
| | ९) खिलाफत चळवळ व मुस्लिम कारवाया | |
| | १०) संघाचा संकल्प | |
| २. | **राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना व विकास** | २५ ते ४६ |
| | १) संघाची स्थापना | |
| | २) संघाचे नामकरण | |
| | ३) संघाचा गणवेश | |
| | ४) मोहितेवाडयाची निवड | |
| | ५) संघाच्या आज्ञा | |
| | ६) संघाचा पहिला उत्सव | |
| | ७) संघाचा पहिला वार्षिक उत्सव | |
| | ८) संघाचे इतर उपक्रम | |
| | ९) नागपूरातील मुस्लिमांच्या वाढत्या कारवाया | |
| | १०) संघाची पहिल्या प्रतिज्ञेचा कार्यक्रम | |
| | ११) एक चालकानुवर्तित्व पध्दत | |
| | १२) जंगल सत्याग्रह | |
| | १३) शाखांचा विस्तार | |
| | १४) डॉक्टरांचे आजारपण व मृत्यू | |
| ३. | **द्वितीय सरसंघचालक मा. स. गोळवलकर गुरूजी** | ४७ ते ७३ |
| | १) सरसंघचालकपदी गुरूजींची नियुक्ती | |
| | २) संघकार्यात योगदान करणाऱ्या काही महत्वाच्या व्यक्ती | |
| | ३) विवेकानंद शिलास्मारक | |

४) १९४२ ची चळवळ व संघ
५) पाकीस्तानची मागणी व फाळणी
६) गांधी हत्या आणि संघावरील पहिली बंदी
७) १९५० नंतरच्या देशातील इतर घडामोडी व संघ
८) गोहत्या बंदी आंदोलन
९. गुरूजींचा ५१ वा वाढदिवस
१०) गुरूजींचा देहवास
११) गुरूजी कालीन इतर क्षेत्रातील प्रवेश
अ) नियत कालीके
१२) अखिल भारतीय विद्यार्थी परिषद
१३) भारतीय मजदूर संघ
१४) वनवासी कल्याण आश्रम
१५) विद्याभारती
१६) भा.ज.प
१७) विश्व हिंदु परिषद

४. **३ रे संघचालक बाळासाहेब देवरस** **७४ ते ७७**
१) सेवाभारती (दिल्ली)

५. **इतर महत्वाची माहिती** **७८ ते ८२**
१) एक तासाची शाखा
२) आदर्श शाखेची पाच सुत्रे
३) देशभराचे संकलीत वृत १९९३-९४
४) जुलै ९६ विश्व विभाग वृत्त
५) आखिल भारतीय वृत्त
६) संघाचे प्रमुख सहा उत्सव
**७) राष्ट्रीय संकटात रा. स्व. संघाने केलेल्या सहाय्याची झलक**

६. **कोल्हापूर जिल्हा** **८३ ते ९०**
१) प्रस्ताविक
२) संघ दृष्टया कोल्हापूर जिल्ह्याची रचना
३) २० शतकाच्या पूर्वीची कोल्हापूरातील भोगौलिक सामाजिक राजकीय परिस्थिती

अ) कोल्हापूरची भोगौलिक स्थिती
ब) कोल्हापूरातील पूर्वइतिहास
I. १००० ते १२१२ कोल्हापूरची शिलाहार
II. १३१९ ते १६५९ मुस्लिम कालखंड
III. मराठा कालखंड १६५९
IV. इंग्रजांचे वर्चस्व
V. कोल्हापूरचे शाहू महाराज
क) सामाजिक स्थिती
I. सत्यशोधक समाज
II. आर्य समाज
III. थिऑसॉफी सोसायटी
IV. बलभीम युवक
ड ) राजकीय चळवळी
I. १८५७ चा उठाव/बंड
II. शिवाजी क्लब
III. कोल्हापूर प्रतिनीधी सभा

७. **कोल्हापूर जिल्ह्यातील संघ कार्य** **९१ ते १२५**
अ) १९३२ - १९४८
१) जिल्ह्याचे वैशिष्टये
२) कोल्हापूर जिल्ह्यातील संघाची स्थापना
३) राष्ट्रीय स्वयंसेवकऐवजी राजाराम स्वयंसेवक संघ
४) कोल्हापपूर जिल्ह्यातील संघ कामाचा विस्तार
५) संघविरोध
**६) १९४८ ची वंदी व कोल्हापूरातील परिणाम**
ब) १९४९ – १९७५
I) संघावरील दुसरी बंदी १९३२ - १९४८
क) १९७७ – १९९५
ड) संघ परिवार क्षेत्र (कोल्हापूर जिल्हा)
**१) भारतीय जन संघ / भाजप**
२) भारतीय मजदूर संघ
३) सामाजिक समरसता मंच
**४) विश्व हिंदू परिषद**
५) संस्कार भारती
**६) सहकार भारती**
७) राष्ट्र सेविका समिती
८) अखिल भारतीय विद्यार्थी परिषद

९) वनवासी कल्याण आश्रम
१०) अखिल भारतीय ग्राहक
११) भारतीय किसान संघ
**१२) शिवराष्ट्र धर्म संघटना**
**इ) काही संस्मरणीय घटना**

८. **परिशिष्ठ** **१२६ ते १३६**
कोल्हापूर जिल्ह्यातील जबाबदाऱ्या व त्याचे आजपर्यंतचे पदाधिकारी
अ) संघ चालक
ब) कार्यवाह
क) प्रचारक
ड) कधी ना कधी शाखा लागलेली अशी स्थाने

**९. कोल्हापूर जिल्ह्यातील संघाच्या संस्था** **१३७ ते १४१**
१) पुणे जनता बँक
२) पंचगंगा बँक
**३) भोगावती सांस्कृतिक मंडळ**

**१०. कोल्हापूरच्या संघ कार्यात सिंहाचा वाटा असणाऱ्या व्यक्ती**
१) चिमण अष्टेकर १४२ ते १५३
२) दादा बंकापुरे
३) भालजी पेंढारकर

**११. समारोप** **१५४ ते १५६**

# -: मनोगत :-

आज संघ ही जगातील सर्वात मोठी हिंदुत्व संघटना आहे. समाजाच्या प्रत्येक घटकाशी संघाचा कोणत्या ना कोणत्या स्वरूपात संबंध आहे. याचा परिणाम अलीकडच्या काळात स्वत:ला हिंदु म्हणून घेण्यास कोणाला ही शरमेचे वाटत नाही,गर्व से कहो हम हिंदु है। या वाक्यात प्रत्येकाला अभिमान वाटतो शिवाय आज प्रत्येक जात उपजात ही स्वत:च्या जाती समोर हिंदु हा शब्द लावतात.

पण ज्या काळात स्वताला हिंदु म्हणून घेण्याचे लज्जेचे,अपघातानेच हिंदु म्हणून जन्मलो,तेंव्हा मला गाढव म्हणा पण हिंदु म्हणू नका अशी भावना लोकांच्या मनात होती त्या काळात मी हिंदु आहे असे म्हणणारे डॉ. हेडगेवार व त्यांनी हिंदुच्या संघटने साठी त्यांच्या मनात हिंदुत्व जागवण्यासाठी १९२५ साली स्थापन केलेली रा.स्व.संघ यासंघटनेने आज बरेच यश प्राप्त केले आहे.

संघाने स्वयंसेवकात एकमेकाविषयी अतुट बंधुभाव निर्माण करण्यात यश मिळवले आहे. तो स्वयंसेवक पुढे कुठे ही गेला तरी हा भाव अतुट व बळकट राहतो. संघाच्या संघ परिवार म्हणून अनेक संस्था आज देश भरात तर काही संस्था अंतराष्टीय स्तरावर काम करीत आहेत. समाजकारण राजकारण विद्यार्थी संघटना, मजुर चळवळ या सर्व भिन्न जरी असल्या तरी या संघटना संघ परिवार म्हणूनच स्वत:ची ओळख सांगतात याला कारण संघ हे त्याचे शक्तिकेंद्र (Power Center) आहे.

मी स्वत: संघाचा लहानपणापासूनचा स्वयंसेवक आहे. मला संघाची कार्यपध्दती रचना नेतृत्व याची यथायोग्य जाण आहे. आज संघावर अनेक प्रकारे लिखाण होत आहे पण संघाचे कार्य हे स्थानिक पातळीवर मोठ्याप्रमाणात चालते त्या ठिकाणची माहिती प्रकाशात आणणे आवश्यक आहे. म्हणून कोल्हापूर शहराची तेथील कार्यकर्त्यांची व त्यांचे कार्य याची माहिती लिहीण्याचा हा अल्पसा प्रयत्न.

याविषयावर लिहताना खरी अडचण येते ती साधनसामुग्रीची पहिली जवळ जवळ पस्तीस चाळीस वर्षे संघ प्रसिध्दीपासून पूर्ण दुर होता त्यामुळे ज्यांनी ज्यांनी आपले आयुष्य खर्चून संघ काम उभे केले. व त्यांना काम करताना आलेले अनुभव अडचणी या अक्षरबध्द होवू शकल्या नाहीत. पण त्यांच्या संपूर्ण समर्पीत अशा जीवनाचा विस्मय वाटत राहतो.

प्रत्येक प्रांतात अनेक जाती आहेत त्यांचे परस्पराविषयी राग लोभ आहेत पण असे असूनही सर्व प्रांतात संघाचे काम उभे राहिले कोणत्याही वेगवेगळया दोन प्रांतातील अपरिचीत असलेल्या अशा स्वयंसेवकांची भेट झाली तरी मनाची कवाडे पूर्ण खुली होतात. ही किमया कोणी केली ? असा प्रश्न पडेल .

संघ म्हणजे शाखा व शाखा म्हणजे कार्यक्रम असे सुत्र आहे यातील प्रत्येक शाखेचा अभ्यास होणे आवश्यक आहे. याविषयावर लिहीताना सामुग्रीची मर्यादा अतिशय जाणवते.

कोल्हापूरात १९३२ – १९५० पर्यंत कागदोपत्री नोंद हा भाग नव्हताच त्यामुळे त्याकाळातील घटनांचे संकलन करावयाचे म्हणजे त्याकाळातील स्वयंसेवकांच्या भेटी घेणे , त्यांच्या स्मृतीत जे असेल ते समजून घेणे व त्याची खात्री करून घेणे हेच महत्वाचे काम होते.

संघात अधिकारी पद हे सत्तेचे , मनाचे नसून तो एक व्यवस्थेचा भाग आहे. त्यामुळे त्यातही वेळोवेळी बदल होत असतात. कागदोपत्री नोंदी अत्यल्प असल्याने संघ व संघ परिवारातील काही जबाबदार कार्यकर्त्यांच्या भेटीवर अधिक भर दिला गेला.

या विषयावर लिहीताना कोल्हापूर शहरातील आर के नगर येथे राहणारे वि. शं. नाखे यांनी येथील कार्यकर्त्यांच्या आठवणी गोळा करून एक फाईल तयार केली होती. या फाईलीचा उपयोग कोल्हापूरातील माहिती लिहीताना अत्यंत झाला. वि. शं. नाखेंचे ऋण या लेखणाच्या दृष्टीने फार महत्वाचे आहे.

शेवटी हा प्रबंध पुर्ण करण्यासाठी ज्यांचे सहकार्य, मार्गदर्शन, प्रोत्साहन लाभले त्यांचे आभार मानणे हे माझे परमकर्तव्य आहे. माझे मार्गदर्शक गुरूवर्य डॉ. बी. आर. कांबळे सर यांनी केलेल्या बहुमुल्य मार्गदर्शनामुळेच हा प्रबंध पुर्ण होऊ शकला. त्याचबरोबर यामध्ये आपला बहुमोल वेळ काढून मार्गदर्शन करण्याचे काम केले ते इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. भोसले सर , डॉ. खणे सर यांनीही वेळोवेळी मार्गदर्शन केले.

रा. स्व. संघाचे प्रांत, जिल्हा , तालुका , शहर स्तरावरील अधिकारी, संघाचे वयोवृध्द स्वयंसेवक यांनी अत्यंत आपुलकीने हवी ती मदत देऊ केली. विद्यापीठ ग्रंथालयातील कर्मचारी, सकाळ-पुढारी , सत्यवादी वृत्तपत्रांचे संपादक , गर्जना प्रेस यांनीही संदर्भ मिळवून देण्यासाठी मदत केली. हा प्रबंध लिहिण्यासाठी मला माझ्या व्यवसायातून पुर्णपणे मुक्त करून स्वत: व्यवसायाची जबाबदारी स्विकारून माझी सौ. आई हिच्या मुळेच मला वेळ मिळू शकला. ग्रंथालयात न मिळालेली पुस्तके संघ कार्यकर्त्यांनी उपलब्ध करून दिली. टाईप करण्याचे काम विश्वनेट कॉम्प्युटर्स प्रा. लि. चे श्री. गायकवाड यांनी रात्रंदिवस जागुन केले त्यामुळेच हा प्रबंध वेळेत पुर्ण होऊ शकला.

अशाच प्रकारे मला मदत करणाऱ्या या सर्वांचा मी आभारी आहे. त्यांना मी मन:पुर्वक धन्यवाद देतो.

## मुलाखाती घेतलेल्या व्यक्ति ( संघ कार्यकर्ते ) :-

१९३२ साली डॉ. हेडगेवार प्रथम कोल्हापूरात आले असता त्यांच्या त्या बैठकीत उपस्थित असलेले व प्रतिज्ञा घेतलेले श्री. रामभाऊ कोडोलीकर, श्री. बाबा अष्टेकर, १९३५ पासून आजतागायत कोल्हापूर जिल्हयाच्या संघ कामाशी ज्यांचा जवळून घनिष्ठ संबंध आहे असे सांगलीचे श्री. वसंतराव भिडे. १९३७ पासून संघात असलेले व कार्यवाह, शहर संघचालक , जिल्हा कार्यवाह , जिल्हा संघचालक म्हणून काम केलेले श्री. बाबा खासबारदार , जवळ जवळ २५ वर्षे जिल्हा कार्यवाह म्हणून काम केलेले श्री. आण्णा ठाकूर, कोल्हापूर जिल्हयांत ज्यांनी १५-२० वर्षे प्रचारक म्हणून काम केले असे श्री. राजाभाऊ भोसले व कै. माधवराव साने, १९४७ ते ५३ या काळात प्रचारक म्हणून काम केलेले श्री. किसनराव इनामदार , पन्हाळ्याचे इतिहास संशोधक श्री. मु.ग.गुळवणी , जिल्हा संघचालक म्हणून असलेले कै. रामभाऊ राशिनकर, विभाग कार्यवाह म्हणून काम केलेले सांगलीचे श्री. बिंदू माधव कुलकर्णी, १९५५ ते ५७ या काळात जिल्हा प्रचारक म्हणून काम केलेले श्री. बाळासाहेब लिमये, जबाबदारी घेऊन संघ काम केलेले व आजही संघकामात असलेले श्री. आण्णा मेथे , श्री. बाळासाहेब सांगलीकर , डॉ. कविश्वर , डॉ. धर्माधिकारी , श्री. रामभाऊ वालावलकर (आजरा) श्री. बाळासाहेब जोशी ( निपाणी) , श्री. आप्पा कुलकर्णी (कडवे) श्री. पी.जी. आपटे, श्री. प्र.वि. जोशी , जिल्हा कार्यवाह , श्री. सुनील कुलकर्णी, जिल्हा सह-कार्यवाह, जिल्हा प्रचारक श्री. उत्तमराव कुदळे यांचा समावेश आहे.

## मुलाखती घेतलेल्या व्यक्ति (संघ परिवारातील कार्यकर्ते) :

१९६४ पासून जनसंघाचे व सध्या भा.ज.पा. चे पूर्णवेळ काम करणारे श्री. ज.गो.कुलकर्णी , सामाजिक समरसता मंचचे श्री. वि.गो.कुलकर्णी , ग्राहक पंचायतीचे सुरवातीपासून आजतागायत जिल्हा प्रमुख या नात्याने प्रभावी काम करणारे प्रा. श्री. श्रीश भांडारी, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री म्हणून १०-१२ वर्षे काम केलेले श्री. मु.ग.देशपांडे ,वि.हिं.प. चे सुरवातीचे कार्यकर्ते श्री. आप्पासाहेब परांजपे, भारतीय मजदूर संघ विभाग

संघटन मंत्री श्री. सुरेंद्र देसाई, विद्यार्थी परिषदेचे सुरूवातीचे व प्रदेश मंत्री म्हणून काम केलेले श्री. माधव ठाकूर , सध्याचे जिल्हा अध्यक्ष प्रा. शं. गो. कुलकर्णी, राष्ट्रसेविका समितीच्या विभाग प्रमुख सौ. स्नेहलता फडके, श्रीमती कमलताई नामजोशी यांचा समावेश आहे. या सर्वांच्या सहकार्यामुळेच हे संकलन शक्य झाले आहे.

कोल्हापूर जिल्हयातील सुरूवातीपासूनच्या संघकामाची माहिती व परिवार क्षेत्रातील कामाची तोंड ओळख व्हावी इतकेच यातून साध्य होते.

******